**संक्षिप्त फौजदारी केस नं. १४७/२०२४**
**नि. क्र. २४**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – प्रणव श्रीराम कोळवणकर,

**वय**– ३० वर्षे , **व्यवसाय** – रिक्षा चालक,

**राहणार**– धामणी, ब्राम्हणवाडी, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मी माझ्या रिक्षाचे भाडे घेवुन बडदवाडी येथे गेलो होतो. माझ्या रिक्षाचा क्र. एमएच–०८–एक्यु–६६५८ असा आहे. तेथुन येताना होंडा शोरुमसमोर धामणी स्टॉपच्या अलीकडे एक रिक्षा व एक दुचाकी यांचा अपघात झाला होता. सदर रिक्षाचा क्र. ४१७४ असा होता व माझ्या ओळखीचे श्री. दत्तात्रय कोतवडेकर यांची होती. दुचाकीस्वार याचे नाव – आकाश खुर्देकर असे होते. त्याच्या दुचाकीचा क्र. ०४७७ असा होता.

**०२.** सदर अपघातामध्ये दुचाकीस्वाराला दोन्ही हातांना व डोळयाच्या वरील भागास मार लागला होता. होंडा शोरुम मध्ये कामाला असणारा 'शिंदे' नावाचा व्यक्ती माझ्या ओळखीचा असल्याने त्याने मला जखमी दुचाकीस्वाराला दवाखान्यात नेण्यासाठी सांगितले होते. त्यामुळे मी सदर दुचाकीस्वाराला माझ्या रिक्षातुन ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर येथे घेवुन गेलो होतो. सदर अपघाताबाबत तो कोणाच्या चुकीमुळे घडला याबाबत मी चौकशी केली नाही.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात***

***प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

०३. *(साक्षीदारास त्याच्या जबाबातील **चिन्हांकित भाग अ** कडील मजकुर वाचुन दाखविला). सदरचा मजकुर बरोबर नाही. तो तसा माझ्या तपासटिपणात का नमुद आहे, याचे काही कारण मला सांगता येणार नाही. (साक्षीदारास त्याच्या जबाबातील **चिन्हांकित भाग ब** कडील मजकुर वाचुन दाखविला). सदरचा मजकुर बरोबर नाही. तो तसा माझ्या तपासटिपणात का नमुद आहे, याचे काही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात रिक्षा चालकाच्या चुकीमुळे घडलेला आहे.* हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविणेसाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:46:51 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १०.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 10/03/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | :- | 10/03/2026 |